(121)

(1) Notification file
(2) Correspondence file
Murtizapur

अमरावती जिल्हयातील मुर्तिझापूर-दर्यापूर रस्त्यावरील मुर्तिझापूर येथील रेल्वे उड्डाण पूलावर पथकर बसविणे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन निर्णय क्रमांक- खाक्षेस-२००४/प्र.क्र.२५५/रस्ते-८.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक - १६.३.२०११.

निर्णय - व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी सोबतची दिनांक १६.३.२०११ ची इंग्रजी व मराठी अधिसूचना असाधारण पत्राच्या भाग ४-ब मध्ये त्वरित प्रसिध्द करावी. सदर अधिसूचनेच्या १०० प्रती या विभागाकडे पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१६.३.२०११

(सं. श्री. सोलंकी)
शासनाचे उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,शिबिर कार्यालय, नागपूर
मुख्य अभियंता, सा.बा.प्रादेशिक विभाग, अमरावती
अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, अमरावती
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नागपूर
कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अमरावती
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, अमरावती
जिल्हाधिकारी, अमरावती
पोलीस अधीक्षक, अमरावती

प्रत,

प्रसिध्दी संचालनालय, मुंबई

# अधिसूचना

सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १६ मार्च,२०११

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.

क्रमांक:खाक्षेस२००४/प्र.क्र.२५५/रस्ते-८, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५), याच्या कलम २० ची पोट-कलमे *(१-अ), (१-ब), (१-क), (१-ड)* आणि *(१-इ)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याला समर्थनीय करणा-या अधिकारांचा वापर करून आणि शासन अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक-खाक्षेस-२००४/प्र.क्र.२५५/रस्ते-८ दिनांक ६ डिसेंबर, २००७ च्या पुढे महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, अमरावती जिल्ह्यातील मुर्तिजापूर - दर्यापूर रस्त्यावरील मुर्तिजापूर रेल्वे उड्डाणपुलाचा वापर करणाऱ्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने, दिनांक ६.२.२०११ ते दिनांक ५.२.२०१७ या कालावधीकरीता किलोमीटर ५१/१०० मध्ये स्थित पथकर स्थानकावर पथकर बसविण्यात आला आहे व तो पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. १. | वाहनांचा प्रकार २. | पथकराचे प्रतिफेरीचे दर (रूपये) ३. | | |
|---|---|---|---|---|
| | | ०६/०२/२०११ ते ३१/०३/२०१३ | ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१६ | ०१/०४/२०१६ ते ०५/०२/२०१७ |
| १. | स्कूटर, मोटार सायकल, चालका व्यतिरिक्त तीन प्रवासी वाहन क्षमता असलेल्या ऑटोरिक्षा, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर. | निरंक | निरंक | निरंक |
| २. | मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमुद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने, | | | |
| | (अ) कार, जीप, टाटा सुमो, ट्रॅक्स, वाहन चालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा, कमांडर व इतर तत्सम वाहने (चालक वगळून १२ प्रवासी क्षमता असलेली) | १५.०० | २०.०० | २५.०० |
| | (ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालका व्यतिरिक्त १२ पेक्षा अधिक आणि २० पर्यंत प्रवासी वाहन क्षमतेची) आणि अनुक्रमांक ३ व ४ येथे मध्ये नमूद नसलेली माल वाहतुकीची वाहने. | २५.०० | ३०.०० | ३५.०० |
| ३. | ट्रक, बस | ५५.०० | ६५.०० | ७५.०० |
| ४. | मोटार वाहन अधिनियम- १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेली वाहने वगळून अवजड वाहने उदा. ट्रक-ट्रेलर, दोन पेक्षा अधिक आसांची वाहने. | ८५.०० | १००.०० | १२०.०० |

टीपा : १. पथकराच्या दरामध्ये खालील प्रमाणे सूट देण्यात येईल.

(अ) पथकराच्या ५० कुपन्सची पुस्तिका आगाऊ खरेदी करणाऱ्यास पुस्तिकेच्या किंमतीमध्ये १० टक्के सवलत देण्यात येईल.

(ब) पथकराच्या १०० कुपन्सची पुस्तिका आगाऊ खरेदी करणाऱ्यास पुस्तिकेच्या किंमतीमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

(क) वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी परतीच्या प्रवासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या वाहनांच्या एकेरी प्रवास दराच्या अनुक्रमे दीड पट व अडीच पट असतील. परतीच्या प्रवासाचा पास व दैनिक पास हा ज्या दिवशी पास काढला जाईल त्या दिवशीच्या रात्री १२.०० वाजेपर्यंत ग्राह्य राहील.

(ड) मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्या ५० पट राहतील.

२. खालील वाहनांना पथकरातून सूट देण्यांत येईल.

(१) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधान परिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.
(२) केंद्र व राज्य शासकीय वाहने.
(३) पोलिस वाहने.
(४) लष्कराच्या मालकीची वाहने.
(५) टपाल व तार खात्याची वाहने.
(६) रुग्णवाहिका.
(७) शववाहिका.
(८) अग्निशमन दलाची वाहने.

३. या प्रयोजनाकरीता उपरोल्लेखित पथकर नाक्यावर वर नमूद केलेल्या कालावधीकरीता पथकर गोळा करण्याचा व पथकराची संपूर्ण रक्कम ठेवून घेण्याचा हक्क महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित,मुंबई यांना प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१६.३.२०११

( सं. श्री. सोलंकी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

# NOTIFICATION

Public Works Department,
Mantralaya, Mumbai – 400 032.
Dated the: 16th March. 2011.

**Bombay Motor Vehicles Tax Act, 1958.**

No. PSP 2004/CR.255/Road–8. In exercise of the powers conferred by sub-sections *(1-A), (1-B), (1-C), (1-D) and (1-E)* of section 20 of the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958 (Bom. LXV of 1958), and of all other powers enabling it in that behalf, and in continuation of Government Notification, Public Works Department number PSP-2004/CR-255/Road-8, dated 6th Decmber,2007, the Government of Maharashtra hereby declares that the toll is levied and continues to be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule appended here to, and on the trailers drawn by such motor vehicles, passing over the Railway Over Bridge (ROB) at Murtizapur on Murtizapur Daryapur Road at the rates and for the periods specified against each of the said motor vehicles in column (3) of the said Schedule, from 6.2.2011 to 5.2.2017 at the toll collection centre at Kilometer 51/100 in Amravati District.

## SCHEDULE

| Sr. No. (1) | Particular of Motor Vehicles (2) | Rate of toll per trip in rupees (3) | | |
|---|---|---|---|---|
| | | 06/02/2011 to 31/03/2013 | 01/04/2013 to 31/03/2016 | 01/04/2016 to 05/02/2017 |
| 1. | Scooter, Motor Cycle, Moped or Any other two-wheeler, Tractor with unladen trolley and Auto Rickshaw registered to carry three passengers, excluding driver. | NIL | NIL | NIL |
| 2. | Light Motor Vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), | | | |
| | *(a)* Car, Jeep, Tata Sumo, Tracks, Six Seater Rickshaw, Commander or any other similar vehicles (having carriage capacity upto twelve passengers, excluding driver). | 15.00 | 20.00 | 25.00 |
| | (b) Mini bus or any other similar vehicles (having carriage capacity of more than twelve and upto twenty passengers, excluding driver) and goods carriage vehicles except vehicles included in entries at serial numbers 3 and 4 below: | 25.00 | 30.00 | 35.00 |
| 3. | Truck, Bus. | 55.00 | 65.00 | 75.00 |
| 4. | Heavy goods vehicles and heavy passenger motor vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), such as Truck-Trailers combination, Multi-axle Vehicles, etc., except vehicles covered by the entry at serial number 3 above. | 85.00 | 100.00 | 120.00 |

Notes : 1. Concessions in rates of toll are as given below, namely:-

a) Ten per cent. rebate will be given to the purchaser of booklet containing 50 coupons in advance.
b) Twenty per cent. rebate will be given to the purchaser of booklet containing 100 coupons in advance.
c) The rates of return journey pass and daily pass of the frequently plying vehicles shall be one and a half times and two and a half times of their respective one way travel rates. Return journey pass and daily pass will be valid upto 12.00 midnight for the day of issuing the pass.
d) The rates of monthly passes will be 50 times of their respective one way travel rate.

2. The following types of vehicles are exempted from payment of toll, namely :-
1. Vehicle carrying sitting members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.
2. Central and State Government Vehicles.
3. Police Vehicles.
4. Defence Vehicles.
5. Vehicles of Post and Telegraph Department.
6. Ambulances.
7. Hearses.
8. Fire Fighting Vehicles

3. For this purpose, the Maharashtra State Road Development Corporation Limited, Mumbai is authorised to collect and retain the amount of toll collected at the above toll collection centre for the abovementioned period.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S S Solanki 16.3.2011

( S. S. Solanki )
Deputy Secretary to Government.